निष्ठूर लोकप्रतिनिधी व शासनामुळे शेतकरी देशोधडीला >>पान 2

प्रकृती परीक्षण चिकित्सा अभियान देशभर राबविणार : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव >>पान 3

स्वतःच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पित्यास ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



अपघातानंतर गोविंदाने डॉक्टरांचे आभार व्यक्त केले, चाहत्यांना दिले धन्यवाद

आतील पान

**सुविचार**

नोकर तर आयुष्यात कधीपण होऊ शकता मालक व्हायची स्वप्न बघा.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 58 ■ शुक्रवार, दि. 04 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# माय मराठीसाठी सोन्याचा दिवस - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आजचा दिवस मराठी भाषा गौरव दिन



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणाऱ्यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक आहे. जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार उत्सव जोपासणाऱ्यांसाठी गौरवाचा, अभिमानास्पद दिवस आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. यासाठी त्यांनी राज्यातील जनतेचे अभिनंदन केले आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या या निर्णयाचे स्वागत करतानाच, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील मराठी प्रेमी, तसेच साहित्यिक, संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचेही कौतुक केले आहे.

आजचा हा दिवस यापुढे 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

मुख्यमंत्र्यांनी संत ज्ञानेश्र्वरांच्या माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातें ही पैजा जिंके।। या ओळींचाही दाखला दिला आहे. ते म्हणतात, अखेर माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने एका लढ्याला यश आले. यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरावा केला होता. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठीला हा दर्जा मिळावा यासाठी आग्रह धरला होता. त्यांच्यासाठी हा निर्णय म्हणजे स्वप्नपूर्ती आहे. निती आयोगाच्या बैठकीतही मराठीला अभिजात दर्जा द्यावा अशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी केली होती. या निर्णयामुळे आपल्या प्रदीर्घ लढ्याला यश मिळाले आहे. मराठी माणसांच्या जिव्हाळ्याचा हा निर्णय आदिशक्तीच्या नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी घेतला गेल्याने दुधात साखर असा योग जुळून आला आहे. आपल्या लाडक्या मराठीचा यथोचित सन्मान केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार मानतो. मराठी भाषा प्रगल्भ आहेच. आता तिचा प्रचार, प्रसार आणखी जोमाने करता येईल. मराठी भाषा आपल्या संतांनी जतन केली, वाढवली. तिचा आपण व्यवहारात आवर्जून वापर केला पाहिजे, असे नमूद करून मुख्यमंत्र्यांनी मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या मराठी भाषक, विचारवंत, भाषा अभ्यासक-संशोधक, साहित्यिक आणि समीक्षक अशा सर्वांचे आभार मानले आहेत.

# मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा

## विधानसभेपूर्वी केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** मराठी भाषेला अभिजात भाषेजा दर्जा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्रातील जनता गेल्या अनेक दशकांपासून करत आली आहे. आजवरच्या अनेक राज्य सरकारांनी देखील ही मागणी लावून धरली होती. अखेर केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजाद दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. मराठीसह एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी व बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.






दरम्यान, केंद्र सरकारच्या या घोषणेनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत एक पोस्ट एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की आजचा दिवस मायमराठीच्या >> पान २

# मायमराठीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक दिवस

## देवेंद्र फडणवीस यांनी मानले नरेंद्र मोदींचे आभार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय हा मराठी भाषेसाठी ऐतिहासिक असून आजचा दिवस सोनेरी दिवस असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.



महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने आभार मानताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात सातत्याने आम्ही पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्र्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. महाराष्ट्रातील आणि जगभरातील तमाम मराठीजनांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मराठी भाषेच्या जतन-संवर्धनासाठी राज्य सरकारने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यात राज्यात मराठी विद्यापीठाची स्थापना, बोली भाषा विस्तार प्रकल्प, राज्यात वाचन चळवळ, पुस्तकांचे गाव, मराठी भाषा भवन असे अनेक निर्णय समाविष्ट आहेत. माय मराठीची पताका अशीच उंच फडकत राहील, असेही श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.

मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची ऐतिहासिक घटना घडली आहे. हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा दिवस आहे. राज्य शासनाने यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. हा क्षण प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यास हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया >> पान २

# जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

## - मुख्यमंत्र्यांनी घेतले जगदंबा मातेचे दर्शन - कोनशिलेचे अनावरण

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खामगांव येथील श्री महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान, आळंदीअंतर्गत जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

खामगांवमधील घाटपुरी येथील श्री.जय जगदंबा माता संस्थान येथे आयोजित या भूमिपूजन समारंभास केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण तथा आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, आमदार आकाश फुंडकर, आमदार संजय गायकवाड, संस्थानाचे अध्यक्ष पंकज केला, उपाध्यक्ष कृष्णकुमार भट्टड, संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम श्री जगदंबा मातेचे दर्शन घेवून पूजन केले. तसेच जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे भूमिपूजन करुन कोनशिलेचे अनावरण केले.



यावेळी संस्थांनच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यांप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी वारकरी संप्रदायांशी संवाद साधला.



## डान्सिंग स्टार मिथुनदांचा गौरव

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा कला क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झालेला  हा पुरस्कार म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या अभिनय कलेचा गौरव आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी जवळपास पाच दशके चित्रपट सृष्टीत व्यतीत केले असून हिंदी, बंगाली सह अनेक भाषेत अभिनय केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत डान्सिंग स्टार म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म १६ जून १९५० रोजी झाला. बी एस सी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटमध्ये प्रवेश घेतला. अभिनयाचे शिक्षण  घेतल्यावर त्यांनी मृगया या बंगाली चित्रपटात अभिनय केला. मृगया या त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे देशभर नाव झाले. त्यांनीही मग हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबई गाठली मात्र इथे त्यांना सहजासहजी चित्रपट मिळाले नाही. त्यांनाही चित्रपटात भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९८२ साली आलेल्या डिस्को डान्सर हा त्यांचा तसा गाजलेला पहिला हिंदी चित्रपट. या चित्रपटाने त्यांना डान्सिंग स्टार बनवले पुढे हीच ओळख त्यांची कायम राहिली. त्यांनीही ही ओळख जपण्याचा प्रयत्न करत अनेक चित्रपटात अप्रतिम नृत्यकला सादर केली. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट हिट होत गेले. विशेषतः ८० च्या दशकात त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. सुरक्षा, तराणा, हम पांच, शौकीन, वारदात, डिस्को डान्सर, प्यार झुकता नही, डान्स डान्स असे त्यांचे अनेक चित्रपट हिट झाले. तो काळ सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेले अनेक चित्रपट त्यांना मिळाले आणि त्यांनी त्यांचे सोने केले. त्यांच्याकडे चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्यांची रांग लागू लागली म्हणूनच त्यांना गरीब दिग्दर्शकांचा अमिताभ असे म्हंटले जाऊ लागले. १९९० साली त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतच अग्निपथ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे ही त्यांनी सोने केले. अमिताभ बच्चन यांच्यासमोर त्यांनी सशक्त अभिनय करून वाहवा मिळवली.  ९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या भूमिका केल्या मात्र ९० च्या  उत्तरार्धात त्यांनी मिळेल त्या भूमिका स्वीकारल्या त्यामुळे त्यांचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले. समीक्षकांनी त्यांना धारेवर धरले पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उतार वयात मात्र ते चरित्र भूमिकांकडे वळले. वीर, गोलमाल ३, हाऊसफुल्ल २, ओह माय गॉड, खिलाडी ७८६, कांची, किक अशा चित्रपटातून त्यांनी चरित्र भूमिका साकारल्या. या भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. छोट्या पडद्यावरील डान्स इंडिया डान्स या नृत्यावर आधारित कार्यक्रमात त्यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांना तीन राष्ट्रीय, दोन फिल्मफेअर, दोन स्टार डस्ट व एक स्क्रीन अवॉर्ड मिळाला.  आता त्यांना दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव झाला असे म्हणावे लागेल. अर्थात त्यांना मिळालेल्या या पुरस्कारावरही काहींनी आक्षेप घेतला आहे. मिथुन चक्रवर्ती हे सत्ताधारी पक्षाचे समर्थक असल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेला असा आक्षेप घेतला जात आहे. अर्थात आक्षेप घेणारेही त्यांच्या अभिनय कलेचे प्रशंसक आहेत हे देखील तितकेच खरे आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचे मनापासून अभिनंदन!

# निष्ठूर लोकप्रतिनिधी व शासनामुळे शेतकरी देशोधडीला

## सिद्धार्थ खरात यांचा सत्ताधार्यांवर घनाघात

## संवेदना,चेतना जागृत मोर्चाला शेतकऱ्यासह नागरिकांची गर्दी

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर** : उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शेतकरी व महाराष्ट्रातील सर्व सामान्याचे हित डोळ्यासमोर ठेवून शेतकर्यांचे दोन लाखापर्यंत कर्ज माफ केले. कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरी केली. त्यामुळे एक उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची नोंद झाली आहे. मात्र काही लाभार्थी लोकांनी आपल्या स्वहितासाठी निष्टेला बाजुला सारून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत गद्दारी केली. या गद्दारांमुळेच राज्यातील शेतकरी हा देशोधडीला लागला आहे.या गद्दार सरकारने ७ हजारांवर विक्री होणारे सोयाबीन हे आता ४ हजारावर आणले आहे. सोयाबीनला ८ हजार रुपये व कापसाला १२ हजार रुपये हमीभाव घेतल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, आम्ही शेतकर्यांची लेकर आहोत. आम्हाला देशोधडीला लावणार्यांचा आम्ही येणार्या विधानसभा निवडणुकीत हिशोब चुकता करूच असा इशारा देत सत्ताधार्यांवर निक्रिय व निष्ठूरतेचा चांगलाच समाचार उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी घेतला.

ते मेहकर येथील तहसील कार्यालयावर दि ३ ऑक्टोबर रोजी संवेदना,चेतना जागृत करण्यासाठी, तसेच निष्ठूर लोकप्रतिनिधीच्या विरोधात आयोजित मोर्चात बोलत होते. सामान्य जनतेचा आक्रोश या निष्ठूर सरकारपर्यंत पोहचावा आणि सरकारची कानउघडणी व्हावी हा या मोर्चाच्या पाठीमागचा हेतू होता. या मोर्चाला शिवसेना बुलढाणा जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, जिल्हा संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर. दिलीप वाघ, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, जिल्हा संघटक गोपाल बछिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख बद्री बोखडे, युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, मेहकर शहरप्रमुख किशोर भाऊ गारोळे, युवासेना शहरप्रमुख ड आकाश घोडे, ड. सुमित सरदार, दिलीप मापारी, तसेच महिला आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि बुलढाणा जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक, तसेच हजारोंच्या संख्येने शेतकरी, कामगार आणि तरुण वर्ग उपस्थित होता.

यावेळी सिद्धार्थ खरात यांनी या निष्ठुर व निष्क्रिय सरकारचा खरपोच समाचार बोलताना घेतला. यावेळी ते म्हणाले की, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी राज्यातील शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून कर्जमाफी केली होती. मात्र हे सरकार शेतकऱ्यांच्या मालाला योग्य मोबदलाही देत नाही, उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात सोयाबीन ही आठ हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे विकली जात होती. तर आता केवळ साडेतीन हजार ते साडेचार हजार दरम्यान प्रतिक्विंटल या भावाने विकली जात आहे. मेहकर मतदार संघात जागतिक दर्जाचे लोणार हे पर्यटन आहे. निसर्गाची ही अनमोल देन आपल्याला लाभली आहे. मात्र या निष्ठूर सरकारने या जागतिक दर्जाच्या सरोवराचा विकास केला नाही व येथील निक्रिय लोकप्रतिनिधीने गेल्या पंधरा वर्षात मतदार संघात विकास करण्याऐवजी मतदार संघ भकास केला आहे. जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असूनही येथे पर्यटनाची कोणतीही सुविधा नाही, हजारो एकर जमिनी एमआयडीसीसाठी आहे. मात्र एमआयडीसी ह्या उभ्या झाल्या नाहीत. तर फक्त त्या कागदावर आहेत. परिणामी मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील तरुण पुण्याजवडील चाकण, छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा, नागपूर जवळील घाटबोरी अशा एमआयडीसीमध्ये केवळ अल्प पगारावर काम करण्यासाठी जात आहे. येथील एमआयडीसी विकसित झाली असती तर हजारो तरुणांना येथेच रोजगार मिळाला असता जागतिक दर्जाचे लोणार पर्यटन स्थळ विकसित झाले असते तर येथेही विविध प्रकारच्या माध्यमातून युवकांना रोजगार मिळाला असता मात्र पंधरा वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून संधी दिल्यानंतरही कोणताही विकास केला नाही, तर मतदार संघ भकास केला आहे. मेहकर येथील बसस्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था आहे. या बसस्थानकावर रात्रीला मायमाऊलीला उभे राहता येत नाही, येताना रात्री उतरता येत नाही तर रात्री या ठिकाणाहून प्रवासाला बसताही येत नाही, या मतदार संघात उच्चशिक्षणाची कोणतीही सुविधा नाही, अशा अनेक समस्या निर्माण केल्यानंतर व पंधरा वर्षे सत्ता उपभोगल्यानंतर आता पुन्हा निवडून द्या अशी विनवणी करीत आहेत. यांना आता तुम्ही निवडून येणार का असा सवाल करतात उपस्थित जनतेने तीव्र नाराजी व्यक्त करीत आता पुन्हा संधी नाही असे म्हणत स्थानिक लोकप्रतिनिधीला विरोध केला.

येथील लोकप्रतिनिधींनी मतदार संघाचा विकास तर सोडा स्वतःच्या गावाला जाण्यासाठी रस्ते सुद्धा केले नाहीत त्यामुळे हे काय मतदारसंघा विकास करतील असा प्रश्न उपस्थित करून लोकप्रतिनिधीच्या निष्क्रिय व निष्ठुरतेवर ताशेरे ओढले.लोकप्रतिनिधीने गेल्या पंधरा वर्षात खूप कुजविले व अंडे उगविले असा टोमला मारला.येथील पेनगंगा येथील घाटामध्ये गेल्या पंधरा वर्षात या लोकप्रतिनिधींनी साधे डिव्हायडर टाकले नाहीत. त्यामुळे या ठिकाणी अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढले आहे परिणामी युवकांचा बळी या ठिकाणी गेलेला आहे. गोरगरीब मायमाऊलींचा पोटचा गोळा गेल्याने त्या घायमोकळून लडत आहेत.

गेल्या सात वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारू शकले नाहीत. मात्र या निष्ठुर व निष्क्रिय लोकप्रतिनिधीला याचे काही देणे घणे नाही यांना गोरगरिबांच्या दुःखाचे स्वयरसुतक नाही, असा घनाघात करत या सरकारचे करायचे काय खाली मुंडक वरील पाय अशा घोषणा देत निष्ठूर व निष्क्रिय लोकप्रतिनिधींवर ताशेरे ओढले.तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने परिवर्तनाची मशाल पेटविली आहे. याला तुम्ही साथ द्या, परिवर्तन घडवा, असे आवाहन सिद्धार्थ खरात यांनी केले. या संवेदना,चेतना जागृत मोर्चाला मेहकर मतदार संघातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती दिसून आली.








### उद्धव साहेब ज्यांना उमेदवारी देतील त्यांना प्रचंड मतांनी निवडून आणू

मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे हे या मतदारसंघातील ज्यांना उमेदवारी देतील त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणून आणि या गद्दारांना येथून चालते करू असा निर्धार करत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे इच्छुक उमेदवार यांनी आपल्या भाषणातून निष्क्रिय व निष्ठूर लोकप्रतिनिधीचा खरपूस समाचार घेतला. यावेळी त्यांनी बुलढाणा जिल्हाच नव्हे तर मेहकर मतदार संघातही गद्दार आले आहेत त्यांना इथून चालते करा असे आवाहन करतात मतदारांनी एकच जल्लोष करत सिद्धार्थ खरात यांना समर्थन दिले.

### पुन्हा एखाद शेतकरी नेत्याचं पिल्लू आणून उभं करतील परंतु आता तरी कृपा करून आता तरी भुलू नका

आमच्याकडे १०ते १२ इच्छुक उमेदवार आहेत खासदार आणि आमदार यांनी दुसरं नाव सांगून दाखवावं का नाही दुसरा उमेदवार ? सतरंजी ताब्यात देण्याचं काम – इ फॉर्म च्या रुपानं नक्की होईल पण त्याला उठवण्याचं काम त्याला पाडण्याच काम त्यांना गाडण्याचं काम मेहकर मतदार संघाला मुक्ती देण्याचं काम सर्वसामान्य मतदारांच्या हातामध्ये आहे शिवसेना प्रमुख बाळासाहेबांचा पुत्र कोणासोबत आहेत अशा महविकास आघाडीच्या उमेदवारालाच एकत्रितरित्या एकाच ठिकाणी मतदान झालं तर आणि तरच आपण या ठिकाणच्या गद्दाराला गाडू शकू पुन्हा एखाद शेतकरी नेत्याचं पिल्लू आणून उभं करतील परंतु आता तरी कृपा करून आता तरी भुलू नका  परिवर्तन मोर्चा दरम्यान संभोधित करताना प्रा.नरेंद्र खेडेकर म्हटले आहे

### शिवसेनेशी गद्दारी करणारे पुन्हा आमदार झाले नाही आणि होणार नाही : जालिंदर बुधवंत

ऐतिहासिक लोणार शहराच्या विकासाठी त्यांना घेणंदेणं नाही खऱ्या अर्थाने या लोकांना ज्या कामाची मागणी  नाही अशे काम आणायचे वैशिट्य पूर्ण नाविन्यपूर्ण कोणते कोणते पूर्ण त्यानाच माहित अन् त्या ठिकाणी करोडो अब्जो रुपये खायचे हाच धंदा त्यानीं केला .पण ज्या ज्या लोकांनी शिवसेनेशी गद्दारी केली गद्दारी  करणारे पुन्हा आमदार झाले नाही आणि होणार नाही तसेच या जिल्ह्यात गद्दार झालेले आमदार पुन्हा निवडून येणार नाही. मेहकर येथील शेतकऱ्यांच्या परिवर्तन मोर्चामध्ये जालिंदर बुधवंत म्हटले आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

# आंबिया बहार सन २०२४–२५ फळ पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा– कृषी मंत्री धनंजय मुंडे

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई दि.३ : पुनर्रचित हवामान आधारित 'फळ पीक विमा योजना' आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्ष, आंबा, पपई व स्टॉबेरी या ९ फळपिकासाठी ३० जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत–जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

या योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होणेबाबत अथवा न होणेबाबत घोषणापत्र ज्या बँकेमध्ये पिककर्ज खाते/ किसान क्रेडिट कार्ड खाते आहे तिथे जमा करणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर बँकेला देणे आवश्यक आहे. जेणेकरुन बँक विमा हप्ता परस्पर कपात करणार नाही. तसेच कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज घेतलेल्या अधिसूचित फळपिकांकरिता विहित नमुन्यातील घोषणापत्र संबंधित बँकेत सादर करणे आवश्यक राहिल. जे कर्जदार शेतकरी विहित मुदतीत सहभागी न होण्यासाठी बँकांना कळविणार नाहीत, असे शेतकरी योजनेत सहभागी आहेत असे गृहित धरण्यात येईल व या शेतकऱ्यांचा विमा हप्ता विहित पद्धतीने कर्ज खात्यातून वजा करण्यात येईल.

अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिके घेणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांस नोंदणीकृत भाडेकरार अनिवार्य आहे. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) आणि उर्वरित विभागाकरीता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे.) अशी मर्यादा राहील. एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी मृग व आंबिया बहार मिळूण जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करण्याची मुभा आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे. त्यासाठी फळपिकांचे उत्पादनक्षम वय पुढीलप्रमाणे राहील. आंबा, चिकू, काजू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ५ वर्षे, लिंबू फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ४ वर्षे, संत्रा, मोसंबी, पेरू, सीताफळ फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय ३ वर्षे, डाळिंब, द्राक्ष फळ पिकासाठी उत्पादनक्षम वय २ वर्षे, केळी, पपई, स्ट्रॅाबेरी पिकासाठी उत्पादनक्षम वय नाही. त्यापेक्षा कमी वयाच्या फळबागा लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल.

ही योजना पुढीलप्रमाणे कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येते .जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, वर्धा आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी लि., जालना जिल्ह्यासाठी फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., छत्रपती संभाजीनगर, धाराशिव अमरावती,अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदुरबार जिल्ह्यासाठी युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. आणि ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, आणि वाशिम जिल्ह्यासाठी बजाज अलियांन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये फळपिक द्राक्ष पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १ लाख २७ हजार असून शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ असा आहे

मोसंबी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. केळी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. पपई पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम १३ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ असा आहे

संत्रा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ३३ हजार आहे. काजू पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख २० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ४० हजार आहे. आंबा (कोकण) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे. गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ असा आहे.

आंबा (इतर जिल्हे) पिकासाठी विमा संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार आहे.गारपीट या हवामान धोक्याकरता विमा संरक्षित रक्कम ५७ हजार आहे. शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ डिसेंबर २०२४ असा आहे.

पान १ वरून...

### मराठीसह पाच भाषांना

इतिहासातील एक ऐतिहासिक दिवस!

फडणवीस यांनी म्हटलं आहे की मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने अतिशय मनापासून आभार मानतो. हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा–मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले आहेत. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला.

उपमुख्यमंत्री म्हणाले, नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. महाराष्ट्रातील आणि जगभरातील तमाम मराठीजनांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवरसुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आतापर्यंत तमिळ, संस्कृत, मल्याळम, तेलुगू, कन्नड आणि ओडिया या सहा भाषांना हा दर्जा मिळाला होता. त्यात आता मराठी, बंगाली, पाली, प्राकृत व आसामी भाषेचा समावेश झाला आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असावी. त्या भाषेतील समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी. ते मूळ त्याच भाषेतील लिहिलेले असावे, अनुवादित नसावे. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे, अशा सर्वसाधारण अटी आहेत. एखाद्या भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत राज्य सरकारकडून प्रस्ताव आल्यावर साहित्य अकादमीकडून पुराव्यांची छाननी होते. त्रुटींची पूर्तता झाल्यावर पुरावे योग्य असल्यास केंद्रीय सांस्कृतिक खात्याकडे शिफारस केली जाते व मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर केला जातो. मराठी भाषेने हे सर्व निकष पूर्ण केले आहेत.

### मराठी भाषेला अभिजात

मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा मंत्री यांनी व्यक्त केली आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांचे साह्य झाले. त्यांच्यासह मोलाचे सहकार्य करणाऱ्या तसेच मराठी भाषिक व मराठीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करून त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, सांस्कृतिक वैभव जगभर पोहचेल -उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गौरवोद्गार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाने जगभरातील मराठीभाषक, मराठीप्रेमी आनंदित झाले आहेत. या निर्णयामुळे मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, समृद्ध सांस्कृतिक वैभव जगभर पोहोचेल, मराठी भाषा ज्ञानभाषा, अर्थार्जनाची भाषा बनण्यास मदत होईल. महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद निर्णय घेतल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रीमंडळाचे मी मनापासून आभार मानतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या प्रतिक्रियेत पुढे म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही महाराष्ट्राची मागील अनेक दशकांची मागणी होती. ही मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे पूर्ण झाली आहे. यासाठी अनेक दशके प्रयत्न करणाऱ्या सर्व मराठी भाषाप्रेमींचे अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समस्त महाराष्ट्रवासीयांचे, मराठीभाषकांचे, मराठी भाषाप्रेमींचे अभिनंदन केले असून यानिमित्ताने सर्वांना शुभेच्छाही दिल्या आहेत.

## अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने निकष विहित केले आहेत.

१. १५००–२००० वर्षापर्यंतची अगदी सुरूवातीच्या ग्रंथाची / अभिलिखित इतिहासाची अति प्राचिनता:

२. भाषकांच्या पिढ्यांनी एक मौल्यवान वारसा म्हणून मानलेले प्राचीन साहित्य / ग्रंथाचा भाग:

३. साहित्यिक परंपरा मूळ असावी आणि ती अन्य भाषक समाजाकडून उसनवारी केलेली नसावी:

४. अभिजात भाषा व साहित्य हे अर्वाचीन साहित्यापेक्षा भिन्न असल्यामुळ अभिजात भाषा आणि नंतरची रूपे किंवा तिच्या उप भाषा यामध्ये खंड देखील असू शकेल.

या निकषांच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती दि.१०.०१.२०१२ च्या शासन निर्णयानुसार गठीत केली होती.

या समितीने बरेचसे इतिहास संशोधन केले असून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ इ. प्राचीन दस्ताऐवज तपासले असून त्यांचा आधार घेऊन पुराव्यासह एक सर्वंकष व परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला आहे. या अहवालामध्ये सविस्तर विवेचनासह मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळणेसाठी विहीत केलेल्या निकषांची पूर्तता करते हे पुराव्यांसह स्पष्ट केले.

समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल दि.१२.०७.२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीमधील अहवाल देखील केंद्र शासनाकडे दि.१६.११.२०१३ रोजी पाठविला.

तद्नंतर सदर प्रस्तावाबाबत सचिव, प्रधान सचिव, मुख्य सचिव, मंत्री, मुख्यमंत्री यांचे स्तरावर सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला.

दि. २७.०२.२०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिनाचे' औचित्य साधून, सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळांच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला.

या संदर्भात राज्यशासनाचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समिती मार्फत विचाराधीन असल्याचे केंद्रशासनाने त्यांच्या दि. २०/१०/२०२० च्या पत्रान्वये कळविले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळावा यासाठी पत्र माहिम राबवून राष्ट्रपती महोदयांना साधारणपणे १ लक्ष पत्रेही पाठविण्यात आली.

प्रस्तावाबाबत सर्वच स्तरावरुन केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. २४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. पंतप्रधान महोदयांना मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरून केंद्रशासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दि. ०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा राज्यशासनाचा प्रस्ताव केंद्रिय मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे कळविले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता ज्ञानेश्वर मुळे सेवानिवृत्त (भा.वि.से.) यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या अधिनस्त कार्यालयांच्या अध्यक्षांचा सदस्य स्वरुपात समोवश असलेली एक समिती शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.१४.०२.२०२४ अन्वये गठित करण्यात आली.

त्यानुसार सदर समितीच्या आतापर्यंत दोन बैठका झाल्या असून या समितीद्वारे केंद्रशासनाकडे पाठपुरावा चालू होता.

# प्रकृती परीक्षण चिकित्सा अभियान देशभर राबविणार : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : आयुष मंत्रालयामार्फत प्रकृती परीक्षण चिकित्सा अभियान येत्या पंधरा दिवसात देशभर सुरू करणार असून विक्रमी संख्येत नागरिकांची तपासणी करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये त्याची नोंद होईल इतपत व्यापक स्वरूपात हेअभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय आयुष्य आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

मेहकर येथील होमिओपॅथी, निमा व डेंटल डॉक्टर्स संघटनेच्या वतीने महेश सेलिब्रेशन सभागृहात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तयावेळी जाधव बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रशांत खडसे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून आ. संजय रायमुलकर हे होते.

प्रारंभी धन्वंतरी पूजन केंद्रीय राज्यमंत्री जाधव, आ. रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज्यमंत्री प्रतापराव जाधव व राजश्री जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. प्रीती आव्हाळे यांनी केले. संघटनेच्या कार्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

आपल्या भाषणात प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, आयुर्वेद हे पुरातन औषधोपचार पद्धती आहे. या उपचारासाठी परदेशातूनही रुग्ण भारतात येतात. ज्या पॅथीचे शिक्षण घेतले आहे. त्याच पॅथीनुसार रुग्णोपचार करण्याला डॉक्टरांनी प्राधान्य द्यावे असेही ते म्हणाले.

देशातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयुष औषधी केंद्र सुरू करण्याचे आयुष मंत्रालयाचे ध्येय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आयुर्वेद उपचार पद्धतीवर मोठे लक्ष आहे. घर घर आयुर्वेद हे ब्रीद घेऊन देश निरोगी




राहावा या उद्देशाने आयुष मंत्रालयाकडून प्रकृती चिकित्सा अभियान देशभर राबविण्यात येणार आहे.

देशभरातील आयुर्वेदिक डॉ. या अभियानात ५ कोटी नागरिकांची तपासणी करून आयुर्वेदिक उपचार देतील, असे सांगून राज्यमंत्री जाधव पुढे म्हणाले की, देशात दिल्ली व गोवा येथे एम्स रुग्णालय असून महाराष्ट्रात ठाणे भागात एम्सचे रुग्णालय उभारण्याचा शासनाचा मानस आहे. आयुर्वेदिक औषधीमुळे रोग प्रतिबंधक शक्ती वाढते. त्यामुळे आयुष मंत्रालयाकडून अमृत औषधालये देशभर सुरू करण्यात येणार आहेत. २५ ते ३० टक्के स्वस्त ब्रॅण्डेड आयुर्वेदिक औषधी या औषधालयांमध्ये नागरिकांना प्राप्त होतील. येत्या काळात बीएएमएसचे शिक्षण एमबीबीएस पेक्षा कुठेही कमी राहणार नाही, या पद्धतीचा अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. अशी माहितीही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. बुलढाणा जिल्ह्यात बीएएमएस डॉक्टरांच्या ४५० जागा रिक्त असून त्या भरण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या, असेही ते म्हणाले.

आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे करीत असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल अभिमान वाटत असल्याचे आपल्या भाषणात आ. संजय रामुलकर म्हणाले. डॉक्टरांच्या संघटनेच्या मागणीनुसार मेहकर येथे आयुष भवन इमारत उभारण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे आश्र्वासन आ. रायमुलकर यांनी यावेळी बोलताना दिले.

मेहकर शहरात ३५० कोटींपेक्षा अधिक रकमेची विकास कामे केल्याची माहिती देऊन भविष्यातही आणखी मोठी कामे करण्यात येतील असे आ. रायमुलकर म्हणाले. निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. निलेश सानप होमिओपॅथी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत खडसे, डेंटल डॉक्टर संघटनेचे डॉ. आशिष लोहिया यांची यावेळी भाषणे झाली. डॉ.मधुकर चांगाडे ,डॉ. सुभाष लोहिया, डॉ. मोहन राजदेरकर, डॉ.गजानन उलेमाले ,डॉ. गोविंद झंवर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. नीरज वखरे,डॉ. पवन मंत्री यांनी केले. डॉ. रहाटे यांनी आभार मानले.

# स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त विधानभवनात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : थोर स्वातंत्र्यसेनानी व मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त आज विधानभवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे, सचिव डॉ.विलास आठवले यांच्यासह विधानमंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्यास गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.



# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांच्या निधीचे ५ ऑक्टोबरला वितरण -कृषी मंत्री धनंजय मुंडे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : पी.एम. किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनांचे माहे ऑगस्ट २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतील अनुक्रमे १८ वा व पाचवा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवार ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी (ता.मानोरा) येथील निधी वितरण समारंभात करण्यात येणार आहे. या समारंभास राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यवतमाळ -वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

शेतक-यांना निश्र्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहेत. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ अखेर राज्यातील जवळपास १.२० कोटी शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यावर एकूण १७ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३२००० कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सन २०२३-२४ पासून नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्यापासून पुढील प्रत्येक हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण चार हप्त्यांमध्ये एकूण ९१.४५ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रु. ६९४९.६८ कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. जून २०२३ पासून आयोजित गावपातळीवरील विशेष मोहिमांद्वारे पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पूर्तता झाल्याने देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांची संख्या आज रोजी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरली आहे.

केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १८ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ईकेवायसी पूर्ण केलेल्या एकूण ९१.५२ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात रू. १९०० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ तर राज्याच्या योजनेमधून रू. २००० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.

# दारव्हा शहर विकास योजनेचा पालकमंत्र्यांकडून आढावा

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ** : दारव्हा शहराचा सुधारीत आणि वाढीव हद्दीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याचे प्रारूप प्रसिध्द करण्यात आले आहे. आराखड्याबाबत पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला.

बैठकीला पालकमंत्र्यांसह जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक राजय साबळे, नगर पालिका प्रशासनचे सहआयुक्त सुमंत मोरे, दारव्हाचे मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दारव्हा नगर परिषदेच्या मुळ हद्दीची सुधारीत विकास योजना २००५ मध्ये मंजूर




झाली होती. सन २०१२ मध्ये नगरपरिषद क्षेत्राची हद्दवाढ झाली. विकास योजना अंमलात आल्यानंतर २० वर्षातून एकदा सुधारीत करणे आवश्यक आहे. तसेच हद्दवाढ झालेल्या क्षेत्राची योजना हद्दवाढ झालेल्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत तयार करून मंजुरीसाठी शासनास पाठवावी लागते.

त्यानुसार दारव्हा नगरपरिषद क्षेत्राची दुसऱ्यांदा सुधारीत व वाढीव हद्दीची विकास योजना तयार करून त्याचे प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले आहे. या योजनेमध्ये विविध प्रयोजनासाठी आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुपावर आरक्षण, झोनींग, रस्ते याबाबत दि.२५ ऑक्टोंबरपर्यंत सूचना, हरकती, आक्षेप मागविण्यात आले आले.

नागरिकांडून प्राप्त झालेल्या सूचना, हरकती, आक्षेपांवर नियोजन समिती व नगर परिषद मार्फत योग्य कारवाई, पुर्तता केली जाईल. आक्षेप नोंदवितांना लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह विहित वेळेत सादर होणे आवश्यक आहे. विकास आराखड्याबाबत नागरिकांकडून येणाऱ्या आक्षेप, सूचनांची योग्य दखल घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. शहराचा विकास आराखडा नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देतील, यादृष्टीने करण्याच्या सूचना देखील पालकमंत्र्यांनी बैठकीत केल्या. नगर रचना विभागाचे सहाय्यक संचालक राजय साबळे यांनी विकास आराखड्याबाबत पालकमंत्र्यांना माहिती दिली.

# महिलांच्या विकासाला चालना देणारे नेतृत्व : ॲड. जयश्रीताई शेळके

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा** : काँग्रेस हा पक्ष सर्वसामान्यांना सोबत घेऊन चालणारा पक्ष असल्याने या पक्षात काम करताना महिलांच्या अडीअडचणी लक्षात आल्या. महिलांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक होणारी कुचंबना दिसून आल्यानंतर महिलांच्या सक्षमीकरणाकरिता टाकलेले पाऊल आता महिलांना एक नवी ओळख देऊन गेले आहे. विविध कार्यक्रमातून महिलांच्या सर्वांगिण विकासाला चालणा देणारे नाव म्हणून आता काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य, दिशा बुलढाणा महिला बचत गट फेडरेशन संस्थापक अध्यक्ष ॲड. जयश्री शेळके यांची ओळख आहे.



महिलांची आर्थिक प्रगती व्हावी, महिलांनी स्वावलंबी बनावे, आपल्या पायावर उभे राहावे, शिक्षीत होऊन घराला सामोरे न्यावे हा उद्देश ठेवून दिशा बुलढाणा महिला बचत गट फेडरेशन संस्थापक अध्यक्ष ॲड जयश्री शेळके यांनी महिलांच्या विकासासाठी दिशा बुलढाणा महिला बचत गट फेडरेशनच्या माध्यमातून विविध कार्यक्रम घेत महिलांना स्वावलंबी बनविण्याचे काम केले आहे. त्यामुळे आजरोजी मेहकर मतदार संघातच नव्हे तर बुलढाणा जिल्ह्यात हजारो महिला ह्या महिला बचत गटाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. महिलांच्या या प्रगतीचा आलेख आता वाढतच असून प्रत्येकवेळेस सुशिक्षीत महिला समोर येऊन महिला बचत गटाच्या माध्यमातून एक उद्योग सुरू करून स्वत:बरोबर घराला सुद्धा आर्थिकदृष्ट्या सक्षम करत असल्याचे दिसून येत आहे. दिशा बुलढाणा महिला बचत गटाच्या वतीने घेण्यात येणार्या बचत गटाच्या मेळाव्यात लाखो रुपयांची उलाढाळ होत आहे. यातून महिलांना मिळणारा नफा सुद्धा लाखोंच्या घरात असून महिलांनी स्वकतृत्वावर सुरू केलेल्या उद्योगातून मिळणार्या मजुरीचे अर्थात नफ्याचे समाधान महिला बचत गटाच्या प्रत्येक महिला उद्योजकांच्या चेहर्यावर दिसून येत आहे.

## ग्रामीण भागातील बचत गटाच्या माध्यमातून विकास साधावा

दिशा बुलढाणा महिला बचत गट फेडरेशनद्वारा महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी काम केल्या जात असून ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या मनातील भिती दूर करून महिला बचत गटाच्या माध्यमातून सर्वांगिण विकास साधावा, कोणतीही अडचण आल्यास दिशा बुलढाणा महिला बचत गटाशी संपर्क साधावा, महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून विकास साधावा, असे आवाहन दिशा बुलढाणा महिला बचत गट फेडरेशन संस्थापक अध्यक्ष ॲड. जयश्री शेळके यांनी केले आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

# स्वत:च्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पित्यास ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/विशेष प्रतिनिधी :** स्वतःच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पित्यास ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००रू. दंड असे शिक्षा ठोठावली आली. हा निकाल बुलढाणा विशेष न्यायालयाच्या वतीने आर. एन. मेहरे यांनी दि.३ ऑक्टोबर २०२४ रोजी दिला आहे.

घटनेबाबत माहिती नुसार, यातील फिर्यादी ही ओरापीची पत्नी असून पिडीता ही स्वतः ची मुलगी आहे. सदरची घटना ही मिलींदनगर बुलढाणा येथील असून घटना दि. १६ जुलै २०१९ रोजी रात्री अंदाजे ८ वाजेच्या दरम्यान घडलेली आहे. त्यावेळेस पिडीता ही आरोपी अर्थात वडिलांच्या रूममध्ये लॅपटॉपवर सिनेमा पाहत असतांना तिला अचानक झोप लागली होती व ती पलंगावर झोपलेली असतांना रात्री उशिरा आरोपी घरी आल्यानंतर त्याने दुष्कर्म केले. त्यामुळे ती घाबरून जागी झाली. त्यामुळे आरोपी वडिल तेथून निघून गेला. त्यावेळी पिडीतेची आई अर्थात फिर्यादी मुंबई येथे जॉब करिता गेलेली असल्यामुळे सदरची घटना पिडीतेने मोठ्या काकूस सांगीतली होती व काही दिवसांनतर आई मुंबईवरून आल्यानंतर आईला सांगीतली होती. परंतु वडील असल्यामुळे बदनामी होवू नये म्हणुन पिडीतेने किंवा तिच्या आईने आरोपीविरूध्द तक्रार दाखल केली नव्हती. त्यानंतर दि.१८ मे २०२० रोजी रात्री अंदाजे १ वाजता तुझी मम्मी माझेजवळ झोपत नाही तर तु माझ्याजवळ झोपायला ये असे वाईट उद्देशाने पिडीतेला म्हटले होते. त्यावरून फिर्यादी/आई व आरोपीमध्ये भांडणे झाली होती. अशा परिस्थितीमध्ये आरोपीच्या सततच्या अशा वाईट कृत्यास कंटाळून फिर्यादी आईने दि. १६ जुलै २०१९ व दि. १८ मे २०२० च्या घटनेबद्दल पो.स्टे. बुलढाणा शहर येथे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवरून व झालेल्या तपासावरून आरोपीविरूध्द भादवीचे कलम ३५४. ३७६ (२) (एफ), ३७६ (अ) (ब) व पोक्सो ॲक्ट चे कलम ४, ८. १२ नुसार दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. दोषारोप पत्र दाखल झाल्यानंतर आरोपीविरूध्द जिल्हा सरकारी वकील वसंत भटकर यांनी एकुण सात साक्षीदार तपासले.त्यामध्ये पिडीता, तिची आई अर्थात फिर्यादी, पिडीतेची मोठी काकू, घटनास्थळ पंच, वैद्यकिय अधिकारी व तपास अधिकारी ह्या सर्वांची साक्ष महत्वाची ठरली. दि.१ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा सरकारी वकील वसंत भटकर यांनी प्रभावी युक्तीवाद केला. तर दि.३ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यमान विशेष न्यायाधीश आर.एन. मेहरे यांनी भादवीचे कलम ३५४ व पोक्सो ॲक्टचे कलम ८, १० व १२ मध्ये आरोपीस दोषी ठरवून त्यास पाच वर्षाचा सश्रम कारावास व ५ हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली.



दंड न भरल्यास चार महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे व भादवीचे कलम ३७६ मधून आरोपीस निर्दोष मुक्त केले आहे. तर पिडीतेला दंडाच्या रक्कमेपैकी ४५०० रुपये अर्थसहाय्य म्हणुन देण्याचा आदेश विद्यमान न्यायालयाने दिलेला आहे व अधिकचे अर्थ सहाय्य होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधीकरणाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक विनीत घाटोळ यांनी केला तर कोर्ट पैरवी एएसआय किशोर कांबळे यांनी सहकार्य केले.

# मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** यावर्षीच्या हंगामामध्ये जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाच्या आधारभुत किंमत योजनेंतर्गत राज्य शासनाच्या वतीने हमी दरात मुंग, उडिद व सोयाबिन खरेदी करण्यात येत आहे. यासाठी शेतकऱ्यांनी खरेंदी केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम.जी.काकडे यांनी केले आहे.

आधारभुत किंमत योजनेअंतर्गत नाफेडच्यावतीने हमीदराने मुंग ८ हजार ६८२ रुपये, उडिद ७ हजार ४०० रुपये, सोयाबिन ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या दराने होईल. मुंग व उडिद नोंदणी व खरेदी दि. ०१ ऑक्टोबर २०२४ पासुन ते ७ जानेवारी २०२५ पर्यंत तर सोयाबिनची नोंदणी दि. १ ऑक्टोबर २०२४ पासुन सुरु करण्यात आली असून खरेदी दि. १५ ऑक्टोबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ सुरु करण्यात येणार आहे.

जिल्ह्यामध्ये मुंग, उडिद व सोयाबिन खरेदीसाठी बुलढाणा जिल्ह्यामध्ये पुढील ११ केंद्रांना मान्यता देण्यात आलेली असुन पुढील केद्रांना नोंदणी व खरेदीचे आदेश देण्यात आलेले आहेत. (तालुका शे. सह. खरेदी विक्री समिती मर्या. बुलढाणा, मेहकर, शेगांव, लोणार, संग्रामपुर) सोनपाऊल ग्रो प्रोड्युसर कंपनी, अंजनी खु. केंद्र– साखरखेर्डा, स्वराज्य शेतीपुरक सहकारी संस्था, चिखली केंद्र– चिखली, कृषि उत्पन्न.बाजार समिती, संग्रामपुर केंद्र – वरवंड बकाल, कृषि उत्पन्न. बाजार समिती, शेगाव केंद्र – माटरगांव, बिबी फार्मर प्रो. कंपनी, केंद्र – किनगाव जट्टू, संत गजानन कृषि विकास शेतकरी उत्पादक कंपनी, मोताळा या केंद्रांना मान्यता दिलेली आहे.

शेतकऱ्यांनी खरेदी केद्रावर नोंदणी करावी. तसेच ज्या शेतकऱ्यांना खरेदीसाठी एसमएएस येतील त्या शेतकऱ्यांनी वरील संस्थांकडे आपला माल विक्रीसाठी घेऊन जावयाचे आहे, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी केले आहे.

## अपघातानंतर गोविंदाने डॉक्टरांचे आभार व्यक्त केले, चाहत्यांना दिले धन्यवाद

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलिवूड अभिनेता गोविंदा यांच्या आज मंगळवारी सकाळी अपघात झाला त्यांच्या पायाला परवाना असलेली त्यांची रिव्हॉल्वर केसमध्ये ठेवताना गोळी लागली आणि ते जखमी झाले. त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टरांनी पायातली गोळी काढली आहे. आता त्यांची प्रकृती बरी आहे. अपघातानंतर त्यांनी एक निवेदन दिले आहे त्यात त्यांनी डॉक्टरांचे आभार मानले आहे तसेच त्यांनी चाहत्यांना धन्यवाद दिले आहे.

ते म्हणाले, ’नमस्कार, मी गोविंदा आहे. तुम्हा सर्वांचे आशीर्वाद आणि बाबांचे आशीर्वाद. त्याला गोळी लागली. पण, गुरूंच्या कृपेने गोळी काढली आहे. मी येथील डॉक्टरांचे आभार मानतो. तुमच्या प्रार्थनांबद्दल तुम्हा सर्वांचे आभार आणि कृतज्ञता व्यक्त करतो. पोलिसांनी त्यांची परवाना असलेली रिव्हॉल्वर ताब्यात घेतली आहे. या प्रकरणी अभिनेता आणि कुटुंबियांचे जबाब नोंदवले जाणार आहे. सध्या ते आयसीयू मध्ये आहे. त्यांच्यावर उपचार सुरु असून ते धोक्या बाहेर आहे.

## विविध वृत्त...

### केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री. प्रतापराव जाधव हे शुक्रवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार, श्री. प्रतापराव जाधव यांचे मेहकर येथून सकाळी १०.३० वाजता बुलढाणा येथे आगमन होईल. दुपारी ३ वाजेपर्यंत विविध कार्यक्रमांना उपस्थित राहतील. त्यानंतर बुलढाणा येथून सोयीनुसार मेहकरकडे रवाना होतील, असे प्र.निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

### जि. प. म. प्राथ. शाळेस दोन संगणक संच भेट; शाळा व्यवस्थापन समितीने केले डॉक्टर डोईफोडे यांचे स्वागत



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** तालुक्यातील येवती गावचे सुपुत्र तथा फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित बालरोग तज्ञ डॉ. गणेश साहेबराव डोईफोडे यांनी येवती येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाची मूलभूत माहिती व्हावी या उद्देशाने दोन संगणक संच भेट दिले. डॉ.गणेश साहेबराव डोईफोडे हे येवती शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका विमल साहेबराव डोईफोडे यांचे सुपुत्र आहेत तसेच ते जि. प. म.शाळा येवतीचे माजी विद्यार्थी देखील आहेत.

डॉ. गणेश डोईफोडे यांनी शाळेप्रती असलेल्या प्रेमाची दखल घेत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवानंद आश्रुजी सानप यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य समाधान कायंदे तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापिका विमल डोईफोडे यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे संचालन शाळेचे मुख्याध्यापक पृथ्वीराज भंडारे यांनी केले. तर शाळेतील शिक्षक वृंद सु.रा पालकर, अ.स. देशमुख, सं.वि. चव्हाण यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. डॉक्टर डोईफोडे यांनी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या शाळेप्रती स्नेहातून गावातील मुलांना संगणकाचे ज्ञान व्हावे या दृष्टीने संगणक भेट दिले आहेत. या संगणकामुळे विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान आत्मसात करता येणार असून डॉ. डोईफोडे यांनी शाळेला दोन संगणक संच भेट दिल्याबद्दल त्यांचे गावात व परिसरात कौतुक होत आहे.

### राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी पाच वाढीव केंद्रांना मान्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील प्राथमिक फेरीसाठी वाढीव पाच केंद्रांना मान्यता देण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील प्राथमिक फेरीतील अस्तित्वातील १९ केंद्रांव्यक्तीरिक्त पाच केंद्रांची संख्या वाढवून एकूण २४ केंद्रे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात हौशी कलावंत संघटनेतर्फे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. दिनांक १० जुलै २०२३ रोजी सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह हौशी कलावंत संघटनेच्या पदाधिका–यांच्या झालेल्या बैठकीत वाढीव केंद्रांना मान्यता देण्याचे आश्वासन मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले होते. या आश्वासनाची पूर्तता झालेली असून पाच वाढीव केंद्रांना मान्यता देण्यात आलेली आहे.

### दिलखुलास कार्यक्रमात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची विशेष मुलाखत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ’दिलखुलास’ कार्यक्रमात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

राज्यशासन जनतेच्या कल्याणासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेत आहे. हे निर्णय विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करत आहे. शिक्षण, आरोग्य, उद्योग, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, तसेच महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच ‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण’ योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी याबाबत मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी ’दिलखुलास’ कार्यक्रमात माहिती दिली आहे.

‘दिलखुलास’ कार्यक्रमात मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांची मुलाखत शुक्रवार दि. ४ आणि शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व ’न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल पवर प्रसारित होणार आहे. जेष्ठ निवेदक शिबानी जोशी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

## कौशल्य विकास विभागाचे नाविन्यपूर्ण उपक्रम कौतुकास्पद - केंद्रीय कौशल्य विकास राज्यमंत्री जयंत चौधरी

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाने युवकांच्या विकासासाठी कौशल्य विद्यापीठ स्थापन केले असून हे देशातील एकमेव कौशल्य विद्यापीठ आहे, ज्यामध्ये कौशल्ययुक्त शिक्षण देऊन प्रत्यक्ष रोजगार देण्यावर भर दिला जात आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब असून राज्याच्या कौशल्य विकास विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून हे कौतुकास्पद असल्याचे केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी सांगितले.

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय येथे आय. टी. आय मुंबईचे नामकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई आणि संत गाडगेबाबा स्वच्छ भारत प्रबोधिनी गोरेगाव, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर येथे शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते आज करण्यात आला. या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा,उत्तर प्रदेशचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री अनिल कुमार,राष्ट्रीय लोकदलाचे महासचिव के.पी.चौधरी, माजी लोकसभा सदस्य मलुक नागर,कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील,कौशल्य विकास आयुक्त प्रदिप डांगे, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री.चौधरी म्हणाले की, आजचा क्षण ऐतिहासिक आहे, कारण आपल्या सर्वांचे आदरस्थान असलेले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या वास्तूत शिक्षण घेतले त्या वास्तूला त्यांचेच नाव देण्याचा समारंभ आणि ज्या व्यक्तीने आयुष्यभर स्वच्छतेचे महत्व पटवून दिले त्या संत गाडगेबाबा महाराज यांच्या नावाने सहा अकॅडमी सुरू करण्यात आल्या आहेत. ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.या दोन्ही महापुरूषांचे विचार आपल्या युवा पिढीने आत्मसात करून आपल्या देशाला तिसरी आर्थिक महासत्ता बनण्यासाठी, कौशल्यपूर्ण विकास करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.महाराष्ट्र शासनाने कौशल्य विकासमध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.मात्र प्रत्येक राज्यात तिथल्या स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून शिक्षण दिले पाहिजे.कोणतेही एक मॉडेल सर्वश्रेष्ट नाही त्यासाठी सर्वांनी एकत्र येवून काम केले पाहिजे.

# राजा राम मोहन रॉय प्रतिष्ठानकडून ग्रंथालयांना अर्थसहाय्य ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राजा राम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान यांच्याकडून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालयामार्फत राबविण्यात येते. त्यानुसार यावर्षीसाठी ग्रंथालयांनी दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथलय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.

सन २०२४–२५ वर्षासाठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्यासंदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना www.rrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा. समान निधी योजनांमध्ये इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना (रु. २५ लक्ष रुपये), वरील योजनेच्या व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करु नयेत.

असमान निधी योजनेत ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन सामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तारासाठी अर्थसहाय्य(फर्निचर खरेदी ४ लक्ष रुपये व इमारत बांधकाम १० ते १५ लक्ष रुपये). राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ‘ज्ञान कोपरा’ विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य (२ लक्ष ५० हजार रुपये) व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरण (२ लक्ष). महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य(६ लक्ष २० हजार व इमारत विस्तारासाठी १० लक्ष). राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य( १ ते ३ लक्ष रुपये), बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय ‘बाल कोपरा स्थापन’ करण्याकरीता अर्थसहाय्य (६ लक्ष ८० हजार) देण्यात येते.

योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी www.rrlf.gov.in या संकेतस्थळावरून माहिती घ्यावी. आवश्यकता असल्यास जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरीलपैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी, हिंदी भाषेत चार प्रतीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

## सोमवारी लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. ऑक्टोबर महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे कळविले आहे.

# वडार व बंजारा समजातील मागण्या पूर्ण करण्यासाठी ताकदीने पाठपुरावा करणार

## सिद्धार्थ खरात यांचे आंदोलनकर्त्यांना आश्वासन; भेट घेऊन मागण्यांबाबत केली चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बंजारा आणि वडार समाजातील तरुणांच्या शिक्षणासंदर्भात असलेली मागणी पूर्ण करावी, वडार व बंजारा समाजातील मुलामुलींना मोफत शिक्षण आणि डोंगरी विभागाचे प्रमाणपत्र द्यावे, या मागणीसाठी भटक्या विमुक्त जाती–जमातीचे अंकुश राठोड व राजू कुसळकर यांनी तालुक्यातील घाटबोरी येथे ’बेमुदत अन्नत्याग’आंदोलन सुरू केले आहे. या अन्नत्यान आंदोलनाला उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे मतदार संघातील इच्छूक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी दि.२ ऑक्टोबर रोजी भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व सदर समस्या निकाली काढण्यासाठी शासनदरबारी संपूर्ण ताकदीनिशी पाठपुरावा करणार असल्याचे आश्र्वासन आंदोलनकर्त्यांना दिले. भटक्या विमुक्त जाती–जमातीचे अंकुश राठोड व राजू कुसळकर यांनी बंजारा आणि वडार समाजातील तरुणांच्या शिक्षणासाठी आणि व्यवसायासाठी भांडवल



उपलब्ध करून द्यावे, त्याचबरोरब वडार व बंजारा समाजातील मुलामुलींना मोफत शिक्षण आणि डोंगरी विभागाचे प्रमाणपत्र द्यावे, या मागणीसाठी तालुक्यातील घाटबोरी येथे ’बेमुदत अन्नत्याग’ आंदोलन सुरू केले आहे. या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच या समाजाच्या मागण्या निकाली काढण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे मेहकर मतदार संघातील इच्छूक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी घाटबोरी येथे प्रत्यक्ष जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यासंदर्भात चर्चा केलीव सर्व मागण्यांना पाठिंबा जाहीर केला. तसेच यावेळी रद्द झालेले डोंगरी विभागाचे प्रमाणपत्र तात्काळ द्यावे, यासाठी बुलढाणा जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करून त्यासाठी पाठपुरावा करणार आहे. तसेच या आंदोलनकर्त्यांच्या सर्व मागण्या सरकारसमोर मांडण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेऊन सदर मागण्या निकाली काढेल. असे आश्र्वासन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे मेहकर मतदार संघातील इच्छूक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी दिले.यावेळी सिद्धार्थ खरात यांच्यासोबत इतर मान्यवरांची व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.